**सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करणेबाबत.**
**श्री. अभिजीत ग. पिसाळ, उपसंचालक संवर्ग.**

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२६/प्र.क्र.३६/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-०९.०४.२०२६.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
10 APR 2026

संदर्भ:-

१. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२१/प्र.क्र.२०६/कोषा.प्रशा-२, दिनांक २०.०४.२०२२.
२. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे पत्र क्र.मुव्य (मासंवऔसं)/प्र/१०३/२०२५, दिनांक १६.०४.२०२५.
३. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्री.अगपिसाळ/प्रतिक्षाधीन/०४.२०२५/२४१, दिनांक २९.०४.२०२५.
४. संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांचे आदेश क्र. था-१८/ब/श्री.पिसाळ/उपसंचालक/आस्था-२/९४४, दिनांक २८.०५.२०२५.
५. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२५/प्र.क्र.५१/कोषा.प्रशा-२, दिनांक १९.०६.२०२५.
६. संचालनालय, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई यांचे आदेश क्र. था-१८/ब/आस्था-२/श्री.पिसाळ/उपसंचालक/१७४, दिनांक २०.०६.२०२५.
७. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/रोख/कार्या-१/श्री.अगपिसाळ/प्रतिक्षाधिन/०६.२०२५/३२५, दिनांक २०.०६.२०२५.
८. संचालनालयाचे पत्र क्र. संलेवको/प्रशा-राप/का.६/स.प्र.का/श्री.पिसाळ/११.२५/१२०५/९८८/५०७९, दिनांक २५.११.२०२५.

57

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील श्री. अभिजीत ग. पिसाळ यांना संदर्भाधिन क्र.१ येथील वित्त विभाग, शासन आदेश दिनांक २०.०४.२०२२ अन्वये उपसंचालक संवर्गात पदोन्नतीने मुख्य लेखा अधिकारी व वित्तीय सल्लागार, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) या पदावर ३ वर्षाच्या कालावधीसाठी दिनांक २१.०४.२०२२ (म.नं.) पासून प्रतिनियुक्तीने नियुक्ती देण्यात आली.

२) श्री. पिसाळ यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दिनांक २०.०४.२०२५ रोजी संपुष्टात येत असल्याने त्यांच्या सेवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) यांचे संदर्भाधिन दिनांक १६.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिनांक २१.०४.२०२५ (म.पू.) पासून राज्य शासनाकडे प्रत्यावर्तीत करण्यात आल्या.

३) श्री. पिसाळ हे पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असल्याने त्यांना संचालनालयाचे संदर्भाधिन दिनांक २९.०४.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. पिसाळ यांना दिनांक २१.०४.२०२५ (म.पू.) पासून संचालनालयात रुजू करुन

00455/2026/661
13.4.2026

घेण्यात आले व त्यांची सेवा संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा, नवी मुंबई कार्यालयात वर्ग करण्यात आली.

४) स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांचे संदर्भाधिन क्र.४ येथील दिनांक २८.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये श्री. पिसाळ यांना दिनांक २९.०४.२०२५ (म.नं.) रोजी स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयात रुजू करुन घेण्यात आले व त्यांना सदर कार्यालयातील पंचायत राज समिती शाखेचे कामकाज सोपविण्यात आले.

५) संदर्भाधिन क्र.५ येथील वित्त विभाग, शासन आदेश दिनांक १९.०६.२०२५ अन्वये पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असलेले श्री. पिसाळ यांना मुख्य लेखा परीक्षक, उल्हासनगर महानगरपालिका, ठाणे या पदावर नियमित पदस्थापना देण्यात आली.

६) श्री. पिसाळ यांना नियमित पदस्थापना दिलेल्या पदावर रुजू होण्यासाठी संचालनालयाचे दिनांक २०.०६.२०२५ रोजीचे आदेशान्वये त्यांना संचालनालयातून दिनांक २०.०६.२०२५ (म.नं.) रोजी कार्यमुक्त करण्यात आले.

७) श्री. पिसाळ यांना दिनांक २१.०४.२०२५ ते दिनांक २०.०६.२०२५ पर्यंत एकूण ६१ दिवस म्हणजेच नियमित पदनियुक्तीचे आदेश मिळेपर्यंत पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. सदर कालावधी "कर्तव्य कालावधी" म्हणून नियमित करणे आवश्यक आहे. नियमित करावयाच्या कालावधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दि.२१.०४.२०२५ ते दि.२९.०४.२०२५ | ०९ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत संचालनालय, लेख व कोषागारे, मुंबई कार्यालयात कार्यरत. |
| दि.३०.०४.२०२५ ते दि.२०.०६.२०२५ | ५२ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत-स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई कार्यालयात कार्यरत. |
| **एकूण** | **६१** | |

८) यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) व (जी) मधील तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील उपसंचालक संवर्गातील श्री. अभिजीत ग. पिसाळ यांचा दिनांक २१.०४.२०२५ ते दिनांक २०.०६.२०२५ रोजीपर्यंतच्या एकूण ६१ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी (रजा कालावधीसह) हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता लेखा अधिकारी (र. व. का), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.अ. भसारकर
०८.०४.२०२६.

**(अविनाश भसारकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*

३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई,*

४) अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई,*

५) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,

६) लेखा अधिकारी (र. व. का.), संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई,*

७) श्री. अभिजीत ग. पिसाळ, उपसंचालक*

८) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,

*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)